# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र State | जिल्हा मुंबई District | पोलीस ठाणे अॅसीबी मुंबई Police Station | पहिली खबर क्र. 30 FIR No. | वर्ष 2024 Year | दिनांक 24/11/2024 Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ...... कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day गुरुवार तारीख पासून Date from 16:00 वेळ Time 20/11/24 तारीख पर्यंत Date to 24/11/24 वेळ Time 16:55 वा.

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 21/11/2024 वेळ Time 11:00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 09/24 तारीख Date 24/11/2024 वेळ Time 08:10 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information समक्ष लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ...... चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name रु.नं. 211 ठिकाणाचे नंबर No. if any दुसरा मजला गल्ली Ward आर/उत्तर विभाग, रस्त्याचे नाव Name of road मनपा
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place कार्यालय, गाव Village दहिसर (पूर्व) पोस्ट Post मुंबई-68 तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ......

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ...... तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name दिपिका डंगारगे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name बाजीराव डंगारगे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 30 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 959496845
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ...... दिल्याचा दिनांक Date of issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation नोकरी
(g) धर्म Religion हिन्दु जात Caste ...... जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता Address रु.नं. 202, 'बी' विंग, न्यु पोलीस अधिकारी वसाहत, घाटकोपर (प) मुंबई-86 गल्ली Ward घर नं. House Name No. फोन नं. Phone No. पॅन नं. Pan No. ओळख नं. Card No.
रस्त्याचे नाव Road ...... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... पो. स्टे. P. Stn. ......
तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री. दिलीप शंकर सरवदे वय-57, धंदा-नोकरी पद-स्वच्छता निरीक्षक मनपा, मुंबई रा.ठि. 'अे' विंग, रु.नं. 401, गोल्डन फिल्ड कॉम्प्लेक्स, जस्मीन सोसायटी, गिता आर्केडच्या समोर, शितल नगर, मिरारोड (पूर्व) जि. ठाणे-401107, मो.नं. 9867211642



Scanned with OKEN Scanner

दिपिका बाजीराव डंगारगे यांचा स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आलेला जबाब हा गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

Malu

(चंद्रकांत माळी)
सहायक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

दिनांक २५/११/२०२५

फिर्याद

मी, दिपिका बाजीराव डंगारणे, वय ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, रा.ठि. रुम नं २०२, बी विंग, न्यू पोलीस अधिकारी वसाहत, घाटकोपर (प) मुंबई–८६, मो.क्र. ९५९४९६८४५०.

मी वरील प्रमाणे असून, दिनांक २१/०८/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणूकीस आहे.

मी शुक्रवार दिनांक २१/११/२०२५ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा.अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्र. ८१/२०२५ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत माळी यांची नेमणुक केल्याबाबात आदेश मिळाल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार श्री. शंकरप्रसाद हरीप्रसाद गुप्ता, वय ४३ वर्षे यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली, त्यांनी सांगितले की, त्यांचे दहिसर पुर्व येथे भाजी मार्केट मध्ये लकी चायनिज आणि भोजनालय या नावाचे हॉटेल आहे. सदर हॉटेलबाबत त्यांनी बृहन्मुंबई महानगर पालिका, सार्वजनिक आरोग्य विभागाचे हेल्थ लायसन्स काढलेले नाही म्हणुन दिनांक १०/११/२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगर पालिका आर/उत्तर वार्ड चे सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी श्री .दिलीप सरवदे हे हॉटेलच्या ठिकाणी तपासणीकरीता आलेले होते. त्यांचेकडे तक्रारदार यांच्याकडे हेल्थ लायसन्स नसल्याने सरवदे साहेबांनी त्यांना लायसन्स नसल्याची नोटीस दिली होती व त्यांना कार्यालयात भेटण्यास बोलाविले होते. परंतु तक्रारदार यांना काम लागल्याने ते भेटण्यास गेले नाहीत. त्यानंतर दिनांक २०/११/२०२५ रोजी श्री .दिलीप सरवदे यांनी तक्रारदार यांचे हॉटेलच्या ठिकाणी येवून हॉटेलवर कारवाई करून पाच टेबल, गॅस शेगडी सेट व गॅस सिलेंडर बाटला जप्त करून घेवून गेले व जाताना त्यांनी तक्रारदार यांना कार्यालयात येवून भेटण्यास सांगितल्याने त्याप्रमाणे तक्रारदार हे बृहन्मुंबई महानगर पालिका आर/उत्तर वार्डचे कार्यालयात गेले व श्री दिलीप सरवदे यांना भेटले. त्यावेळी दिलीप सरवदे यांनी हॉटेलचे हेल्थ लायसन्स नसल्यामुळे कारवाई न करण्याकरिता वर्षाला तीस हजार रूपये हप्ता दयावा लागेल असे सांगितले. श्री गुप्ता यांचेकडे त्यांच्या हॉटेलच्या हेल्थ लायसन्स बाबत तीस हजार रूपये लाच मागणी होत असल्याबाबत खात्री झाल्याने व त्यांना सदरची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २१/११/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय वरळी मुंबई येथे लोकसेवकाच्या विरोधात तक्रार देण्यास आले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांना जास्त लिहता वाचता येत नसल्याने त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांचा तक्रारी अर्ज संगणकावर तयार करून प्रिन्ट काढुन त्यावर त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. मयुर अशोक मोकळ, वय ३४ वर्षे, व्यवसाय – नोकरी, पद – सहायक मोटार वाहन निरीक्षक, कार्यालयीन पत्ता – प्रादेशिक परिवहन विभाग, वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा , मुंबई ४०००३७. रा.ठि – फ्लॅट नंबर आय २०१, २ रा माळा, लोकमान्य पानबाजार कॉम्प्लेक्स, एव्हरड ईस्टन एक्सप्रेस हायवेच्या मागे, सायन (पुर्व), मुंबई ४०००२२. २) श्री. तुषार दत्ताराम महाडिक, वय ३६ वर्षे, व्यवसाय – नोकरी, पद – वरिष्ठ लिपीक, कार्यालयीन पत्ता – कार्यकारी अभियंता(पश्चिम),झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा बांद्रा(पुर्व), मुंबई ४०००५१. रा.ठि – रुम न. ३१०, विश्वराजा दर्शन, डॉ. मुरलीधर सामंत मार्ग, डिलायल रोड, प्रभादेवी(पश्चिम) यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रार अर्ज पंचास वाचण्यास दिला. पंचांचा तक्रार अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सपोआ चंद्रकांत माळी, तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

Scanned with OKEN Scanner

तद्नंतर सपोआ चंद्रकांत माळी यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार श्री. गुप्ता हे लोकसेवक दिलीप सरवदे यांची प्रत्यक्ष भेट घेण्याआधी त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर कॉल करून भेटीची वेळ व ठिकाण याबाबत विचारणा करणार आहेत. त्यानुसार सपोआ चंद्रकांत माळी, आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. रावराणे यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डरची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. तद्नंतर तक्रारदार हे लोकसेवक दिलीप सरवदे यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. रावराणे यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९७६८४०१८५३ यावरून स्पीकर ऑन करून लोकसेवक श्री. दिलीप सरवदे यांस त्यांचे मोबाईल नं. ९८६७२११६४२ यावर कॉल करून ध्वनिमुद्रीत करण्यात आला. ती वेळ १४.५५ ही होती. नमुद संभाषणामध्ये तक्रारदार यांनी लोकसेवकास कधी येऊ असे विचारले असता त्यांनी साडेतिन चार वाजता कार्यालयात बोलावले आणि येताना डिस्पेच कॉपी व नोटीस घेऊन येणे बाबत सांगितले.

वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे मोबाईलवरील झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून लोकसेवक श्री. दिलीप सरवदे यांनी तक्रारदार शंकर गुप्ता यांना भेटण्याकरीता कार्यालयात येण्यास सांगितले असल्याने लोकसेवक हे तक्रारदार यांना लाच मागणी करतात का याबाबत पडताळणी कारवाई लागलीच करण्याचे ठरले. तक्रारदार, पंच व पोलीस पथक यांना मी व सपोआ चंद्रकांत माळी यांनी पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही स्वत:, सपोआ चंद्रकांत माळी, दोन पंच, व पोलीस पथक पडताळणी कारवाई करीता दोन शासकीय वाहनाने १५.३० वाजता बृहन्मुंबई महानगर पालिका आर/उत्तर वार्ड, दहिसर कार्यालयाकडे रवाना झालो. कार्यालयाच्या आलिकडेच सुमारे ०१ कि.मि. अंतरावर वाहने थांबविली. पडताळणी करीता तक्रारदार व त्यांच्या सोबत पंच नामे श्री. मयुर अशोक मोकळ यांना कार्यालयात पाठविण्याचे ठरले. त्यानुसार टेक्निशियन रावराणे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बाजूस बनियनला लावून पंचासह लोकसेवक यांच्या कार्यालयाकडे रवाना केले. थोडया वेळाने १८.०४ वा. दोघेही परत आल्यानंतर त्यांचेकडून माहिती घेतली तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण दोन्ही पंचासमक्ष आम्ही ऐकले. त्यामध्ये लोकसेवक श्री. दिलीप सरवदे यांनी तक्रारदार सोबत गेलेले पंच यांना कॅबिन बाहेर पाठवून तक्रारदार यांना त्यांचेत आदल्यादिवशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने विचारले की **"बाकी कुछ कल का बात हुआ? बाकी कॅश का? क्या तय हुआ अपना? क्या? क्या बात हुआ?"** तसेच **"तो फिर तुम्हारी क्या रजामंदी क्या है? हा... ना... क्या? बोलो तो सही."** असे म्हणाले असता तक्रारदार यांनी **"साहब थोडा कम कर लिजीऐ साब। नाही हो रहा है।"** असे म्हणाले त्यावर लोकसेवकाने त्यांना **"कल कितने पे तय हुआ था?.** असे विचारले असता तक्रारदार यांनी **"कल तिस बोले थे, तिस या पच्चीस बोले थे।"** त्यानंतर लोकसेवकाने **"साल का बोले तो पच्चीस बोले। और भी क्या कम करने का? वौ साल का जो है"** असे म्हणाले. तसेच **"साल को तुमको ईतना ज्यादा लगता है तो बंद करदो। तुम को देता हु मै"** वगैरे बोलले. तक्रारदार यांनी **"साहब मै पैसा नही लाया ना सर"** असे म्हणाले असता लोकसेवक यांनी **"तो फिर क्या मै उसपे साईन करके ऐसा ही देदु क्या?"** असे म्हणाले. तसेच **"बोला था कितना?, फिर कम करते करते करते फुकट ही बोलू क्या?"** इत्यादी बोलले. तसेच तक्रारदार यांनी **"पंधरा कर देता हू सर, आता हु फिर लेकर "** असे म्हणले असता **"नही चाहीऐ मुझे"** असे रागाने बोलले. शेवटी उजव्या हाताच्या पहिल्या दोन बोटे वर करुन **"ठिक है. जाव लास्ट मे इतना करो "** असे खुणावले. यावरुन लोकसेवक श्री. दिलीप सरवदे हे तक्रारदार यांच्या हॉटेलचे जप्त केलेले साहित्य परत करण्याकरीता व हॉटेल विनापरवाना चालविण्याकरीता वर्षाला तिस हजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २०,०००/– स्विकारण्याचे मान्य केल्याचे दिसून आले. तसेच लोकसेवक यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम दुसऱ्या दिवशी फोन केलेनंतर घेवुन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे दोन्ही पंचांसमक्ष पडताळणी पंचनामा करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी दिनांक २२/११/२०२५ रोजी तक्रारदार यांनी आम्हास दुरध्वनीवरून कळविले की, लोकसेवक दिलीप सरवदे यांनी त्यांना आजच्या ऐवजी सोमवार दिनांक २४/११/२५ रोजी लाचेची रक्कम घेऊन येण्यास सांगितले आहे. त्यानुसार सोमवार दिनांक २४/११/२०२५ रोजी तक्रारदार, पंच व पोलीस पथक

लाप्रवि मुंबई कार्यालयात झाल्यानंतर मी व सपोआ चंद्रकांत माळी यांनी पंच तक्रारदार व पोलीस पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची व करावयाची कारवाई याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये वीस हजार रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू.२०,०००/— (त्यामध्ये रू. ५००/— दराच्या भारतीय चलनाच्या ४० नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. त्यानंतर पो.ह. शेमडकर यांनी पंच व तक्रारदार यांना ॲथ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पो.ह. शेमडकर यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू.२०,०००/— रक्कमेतील नोटांना ॲथ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम खाकी रंगाच्या लिफाफ्यात ठेवुन सदर लिफाफ्यासदेखील बाहेरून ॲथ्रोसिन पावडर लावून तो लिफाफा तक्रारदार यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर सपोआ माळी यांनी पोह. शेमडकर हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले.

दिनांक २४/११/२०२५ रोजी १४.२० वा लोकसेवकाचे कार्यालय बृहन्मुंबई महानगर पालिका आर/उत्तर वार्ड, दहिसर येथे सापळा कारवाईकरिता रवाना झालो. त्यानंतर लोकसेवकाचे कार्यालयाचे एक कि. मी. अंतरावर थांबुन सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असुन तक्रारदार यांच्या सोबत पंच मयुर अशोक मोकळ यांना लोकसेवकास लाचेची रक्कम देण्याकरीता पाठविण्याचे ठरले. त्यानुसार तक्रारदार, पंच तसेच सापळा पथक यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा म्हणून उजव्या हाताचा अंगठा वर करुन दाखविण्याबाबत सांगण्यात आले. त्यानंतर टेक्निशियन रावराणे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बाजूस बनियनला लावून पंच मयुर मोकळ यांच्यासह लोकसेवक यांच्या कार्यालयामध्ये पाठविले. त्यांनतर इतर पथक लोकसेवकाच्या कार्यालयाचे ठिकाणी पोहचले व संशय येणार नाही अशाप्रकारे थांबुन राहिले. थोडया वेळाने तक्रारदार हे लोकसेवकाच्या केबिनमधुन बाहेर आले व त्यांनी ठरले प्रमाणे उजव्या हाताचा अंगठा दाखवुन लोकसेवकाने लाच स्विकारले बाबत इशारा केला. त्यानंतर लगेच आम्ही व सापळा पथकाने लागलीच पंचांसह लोकसेवक श्री. दिलीप सरवदे यांना १६:५५ वा लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. सदर लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव दिलीप शंकर सरवदे वय ५७ वर्षे, धंदा नोकरी पद — स्वच्छता निरीक्षक (नेमणुक : आर उत्तर वार्ड/ बृहन्मुंबई महानगरपालिका , रुस्तम स्कुल च्या बाजूला,दहिसर नदी समोर, दहिसर पश्चिम मुंबई —६८) असे सांगितले तसेच पत्ता विचारला असता रुम नं ४०१, अे विंग, ग्रीनफिल्ड कॉम्पलेक्स, बि. नं ०४, शितल नगर, मिरा रोड पूर्व, ठाणे—१११ असे सांगितले. सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक २१/११/२०२५ रोजी आरोपी लोकसेवक दिलीप शंकर सरवदे वय ५७ वर्षे, धंदा नोकरी पद — स्वच्छता निरीक्षक (नेमणुक : आर उत्तर वार्ड/ बृहन्मुंबई महानगरपालिका , रुस्तम स्कुल च्या बाजूला,दहिसर नदी समोर, दहिसर पश्चिम मुंबई —६८) यांनी तक्रारदार श्री.शंकरप्रसाद हरीप्रसाद गुप्ता यांचे लकी चायनिज आणि भोजनालय या हॉटेलचे हेल्थ लायसन्स नसल्याने केलेल्या कारवाईतील जप्त केलेले साहित्य सोडण्याकरीता व हेल्थ लायसन्स शिवाय हॉटेल व्यवसाय सुरु ठेवण्याकरीता वर्षाला ३० हजार रुपयांची लाचेची मागणी करुन दिनांक २४/११/२०२५ रोजी तडजोडीअंती २० हजार रुपये इतकी लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारताना रंगेहाथ पकडले, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(चंद्रकांत माळी)
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तक्रार अर्जावरून पडताळणी कार्यवाही करून गुन्हा दाखल

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ..........

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद ता.वे व ठिकाणी 'फि' यांचे लकी चायनिज सेंटर ॲन्ड भोजनालय नावाचे हॉटेल आहे. 'फि' यांचेकडे बृहन्मुंबई महानगर पालिका आरोग्य विभागाचे हेल्थ लायसन्स नसल्याने 'आलोसे' यांनी 'फि' यांचेकडे हॉटेल चालू ठेवण्यासाठी व कारवाई न करण्यासाठी वर्षाला ३०,०००/- रु. लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- रु. लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून भ्र.प्र.अधि. १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक सचिन शेडकर

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. .......... District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name चंद्रकांत साळी

पदनाम Rank सहायक पोलीस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई.

Posting

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........

1. Date and time of submitted to the Court.

| प्रत<br>Copy to | 2 फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |
|---|---|---|---|---|

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner